प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑक्टोबर 20, 2016

**क्रेडिट ॲग्रिकोल कॉर्पोरेट ॲंड इनवेस्टमेंट बँक (इंडिया)**
**ह्यांचेवर आरबीआय द्वारा दंड लागु.**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 46 (4)(1) सह वाचित, कलम 47 (अ)(1)(क) खाली तिला मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन, रिझर्व बँकेने, क्रेडिट ॲग्रीकोल कॉर्पोरेट ॲंड इनवेस्टमेंट बँक (इंडिया) ह्यांना, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 6 च्या तरतुदीचे उल्लंघन केल्यासाठी रु. 10 दशलक्ष (रुपये दहा दशलक्ष) दंड लागु केला आहे.

ही बँक तिच्या, क्रेडिट ॲग्रीकोल सीआयबी सर्व्हिसेस प्रा. लि. ह्या आऊटसोर्सिंग एजन्सीला अनेक सेवा देऊन तिच्याकडून शुल्क मिळवत होती. बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 च्या कलम 6(1) खाली ह्या कार्यकृतींना परवानगी नसल्याने वरील बँकेला, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 6 चे उल्लंघन केले असल्याची एक कारणे दाखवा नोटिस पाठविण्यात आली होती.

बँकेने दिलेले उत्तर व्यक्तिगत सादरीकरणे व रेकॉर्डवर उपलब्ध असलेले कागदपत्र विचारात घेतल्यानंतर रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघन सिध्द झाले असून दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/979**